# शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे

## पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे आवाहन

### अभ्यास दौऱ्याकरिता निघालेल्या बसला दाखविली हिरवी झेंडी



**प्रतिनिधी/१६ फेब्रुवारी**

**वर्धा :** शेतकरी अभ्यास दौर्यातून शेतकर्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन पारंपरिक शेती बरोबर आधुनिक पद्धतीची शेती कशी करता येईल याचा अभ्यास करावा. आधुनिक पद्धतीचा अवलंब करावा, अशा शुभेच्छा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.

वर्धा जिल्ह्यातील शेतकरी अभ्यास दौर्याकरिता निघालेल्या बसला हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यापूर्वी ते आज रविवार १६ रोजी बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार प्रामुख्याने उपस्थित होते. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर पुढे म्हणाले की, जिल्ह्यात प्रामुख्याने कापूस, सोयाबीन, हरभरा व गहू या सारखी पारंपरिक पिके घेण्यात येतात. मात्र, पश्चिम महाराष्ट्रात फळबाग, भाजीपाला सोबतच शेतीला जोड धंदा म्हणून दुग्ध उत्पादन, कुक्कुटपालन, मत्स्य पालन, शेळी पालन व अन्य व्यवसाय करतात.

विदर्भात व जिल्ह्यात सर्व सोयी उपलब्ध असताना देखील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करीत नाही. त्या तंत्रज्ञानाची माहिती शेतकर्यांना व्हावी व त्यांचे जीवनमान उंचावावे यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. यामुळे शेतकर्यांना फायदा होणार असल्याचा विश्वास ना. भोयर यांनी व्यक्त केला. जिल्ह्यात फळबाग क्षेत्र फारच नगण्य आहे. हे क्षेत्र वाढविण्यास देखील यामुळे मदत मदत होईल असे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी अल्प वेळात पालकमंत्री भोयर यांच्या सुचनेनुसार हा दौरा आयोजित करण्यात आल्याची माहिती देत शेतकर्यांनी या दौर्यातून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन केले.


# नागपूरच्या रेल्वे स्थानकावर मोठी दुर्घटना टळली

**प्रतिनिधी/१६ फेब्रुवारी**

**नागपूर :** मालगाडीला जोडलेला डीजल टँकर मध्य प्रदेशातील रतलाम जिल्ह्यातून चंद्रपूर जिल्ह्यातील तडाली येथे जणार होता. त्याला नागपूर रेल्वे स्थानकावर आग लागली. याची माहिती मिळताच रेल्वेचे अधिकारी ही आग विझवण्यासाठी प्रयत्न करू लागले. ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी फलाटावर तेलंगाना एक्सप्रेस उभी होतीा. ही आग मालगाडीला जोडलेल्या डिझेल टँकरपर्यंत पोहोचली असती तर अनर्थ घडला असता. पण रेल्वे अधिकाऱ्यांनी तत्काळ पावले उचलल्याने ही दुर्घटना टाळली. रतलाम येथून चंद्रपूर जिल्ह्यातील ताडालीला जाणाऱ्या मालगाडीला तेल टैंकर जोडण्यात आला होता. मालगाड़ी दपारी ३..४५ वाजता नागपूरच्या रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक १ आणि २ च्या मुख्य मार्गिकेवर उभी होती.

# आशा चॅरिटेबल ट्रस्ट व डी.एम.एक्स.ग्रुपचा उपक्रम

## रक्तदानासह आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबीर



**ता.प्रतिनिधी/१८ जानेवारी**

**मोर्शी :** आशा चॅरीटेबल ट्रस्ट व डी एम एक्स ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने शंकरगिर महाराज संस्थान चिखलसावंगी येथे आरोग्य तपासणी व नेत्र तपासणीसह रक्तदान शिबिर पार पडले.

यावेळी ३१ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले तथापि ३५० रुग्णांची आरोग्य व ४०० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. खासदार सतत ३६५ दिवस रक्तदान मोहीम व डी.एम.एक्स. ग्रुप महाराष्ट्र राज्य यांचे संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर आशा चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष आमदार उमेश उर्फ चंदुभाऊ यावलकर यांच्या नेतृत्वात पार पडले.यावेळी ३५० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी व ४०० रुग्णांची नेत्र तपासणी करून त्यांना योग्य सल्ला देण्यात आला. नेत्र तपासणीनंतर डोळ्यांच्या पुढील शस्त्रक्रियेसाठी महात्मे हॉस्पिटल नागपूरची टीम उपस्थित होती.

या कार्यक्रमाला डी.एम.एक्स ग्रुप महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष ऋतिक मालपे, सरपंच स्वाती दिनेश चिखले, प्रजय कळसकर, ऋषिकेश सावरकर, डॉ.ऋतुजा सागर श्रीराव, राजेंद्र राऊत, स्वराज राऊत, हरीश सुर्वे, नारायण भुसारी, संकेत बेलसरे, गोपाल चोपडे, चेतन लेकुरवाडे, उमेश कळसकर, योगेश जांभोळे यासह सर्व गावकरी उपस्थित होते.

# महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय देशात सहावे

## ना.प्रताप जाधव यांच्या हस्ते सन्मान




**प्रतिनिधी/१६ फेब्रुवारी**

**वर्धा :** दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठ संचालित सालोड (हिरापूर) येथील महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली आणि भारतीय चिकित्सा पद्धती आकलन व रेटिंग बोर्ड यांच्या तपासणी पथकाद्वारे करण्यात आलेल्या देशभरातील पाहणीनंतर महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय तथा अनुसंधान केंद्रास 'अ' श्रेणीसह राष्ट्रीयस्तरावर सहावे स्थान प्रदान करण्यात आले. या श्रेणीत निवडण्यात आलेल्या देशातील पहिल्या दहा विद्यालयास सन्मानित करण्यासाठी जयपूर येथे विशेष समारंभात आयुष मंत्री प्रताप जाधव आणि हवामहल, जयपूरचे आमदार स्वामी बालमुकुंदाचार्य यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भरत राठी व उपअधिष्ठाता डॉ. गौरव सावरकर यांनी सदर पुरस्कार स्वीकारला. महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे रेटिंग विविध बाबींवर करण्यात येत असून त्यासाठी डॉ. वैशाली कुचेवार, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. ऋषिकेश ठाकरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या मानांकनामुळे दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेला देशात नावलौकिक प्राप्त होऊन संस्थेचे प्रकुलपती डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, प्रकुलगुरू डॉ. गौरव मिश्रा, कुलसचिव डॉ. श्वेता पिसुळकर, कार्यकारी संचालक डॉ. तृप्ती वाघमारे यांच्या मार्गदर्शनात हे मानांकन प्राप्त झाले.

# कमलबाई कावळे यांचे निधन



**वार्ताहर/१६ फेब्रुवारी**

**कुऱ्हा :** येथील स्व.वासुदेवराव कावळे यांच्या धर्मपत्नी कमलबाई वासुदेवराव कावळे यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई,स्नुषा,नातु,नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी करिता सर्व स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.यावेळी सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली.

*श्री संत मारोती महाराज उर्फ घंटीवाले बाबा देवस्थान तर्फे*

# ज्येष्ठ पत्रकार तथा संस्थानचे विश्वस्त अशोक पवार यांचा सत्कार



**वार्ताहर/१६ फेब्रुवारी**

**कुऱ्हा :** वऱ्हा येथील महान कर्मयोगी समर्थ सद्गुरु श्री संत मारोती महाराज उर्फ घंटीवाले बाबा यांचा पुण्यतिथी महोत्सवा निमित्त या वर्षी श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम महापुजा, आरती श्रीमद् भागवत कथा आदी वऱ्हा गावातील महिला भजनी मंडळे,शिव भोले गाणे तसेच काल्याचे कीर्तन ह.भ.प.प्रदिप महाराज गावंडे (गोरेगाव) सर्व वऱ्हा ग्रामवासी तर्फे महाप्रसाद करण्यात आला.

या कार्यक्रमांचा हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.या प्रसंगी आदी मान्यवरांचा महाराज, वारकरी भजनी मंडळ तसेच कुऱ्हा येथील जेष्ठ पत्रकार तथा श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थानचे विश्वस्त अशोक पवार यांचा सत्कार देवस्थानचे सचिव दादाराव वानखडे यांनी दुप्पटा व नारळ देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी देवस्थानचे सर्व प्रफुल्ल मते, विनोद घोटकर, रमेश लांजेवार,सुमित राऊत,बबन डाखोरे, मिलींद चौधरी, प्रकाश गोमासे,हरिश बुगल,सुरज चौधरी आदी सर्व गावकऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात आला.

# मिलकामगाराची मुलगी झाली ऑफीसर

## मामाची मोलाची मदत



**प्रतिनिधी/१६ फेब्रुवारी**

**हिंगणघाट :** अनेकदा अभ्यासाकरिता शांतता-वातावरण नाही, आवश्यक त्या सुविधा नाहीत, परिस्थिती नसल्याचे रडगाणे सांगून वेळ मारून नेतात. मात्र, येथील गिरणी कामगार प्रकाश धोपटे यांची कन्या पुजा राजस्व अधिकारी झाली.

प्रकाश धोपटे यांनी मिल बंद पडल्यानंतर घरीच उपजीविकेसाठी मिर्ची कांडप सुरू केले. पुजाने प्राथमिक ते बारावीपर्यंतचे शिक्षण येथील भारत विद्यालय पुर्ण केले. त्यानंतर सेवाग्राम येथील बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेट्रॉनिक्स अॅण्ड टेली कम्युनिकेशन या विषयात बीई केल्यावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा विचार तिच्या मनात आला. त्याचा अभ्यास करण्यासाठी पुणे येथील एका अकॅडमीत तिने प्रवेश घेतला. हे सर्व करताना वडील व गृहिणी असलेल्या आईचे संपूर्ण पाठबळ होतेच. त्याशिवाय देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक असलेले तिचे मामा प्रा. राऊत यांनी तिला मार्गदर्शन केले.आजच्या तरुणांनी परिश्रम, जिद्द, आणि संयम ठेऊन प्लॅन बी तयार ठेवल्यास उज्वल भविष्य त्याच्या आवाक्या बाहेर नाही असा संदेश पूजा विद्या प्रकाश धोपटे या लेबर कॉलनीत राहणार्या एका मिल कामगाराच्या कन्येने दिला. प्लॅन बी स्पष्ट करताना तीने सांगितले की लोकसेवा आयोगाच्या परीक्षा या कठीण असून यात निवड होण्याची संधी फारच कमी असते. संयम ठेऊन वाट बघत असताना यात यश आले नाही तर तरुणांनी दुसरा पर्याय आपल्या जवळ तयार ठेवावा. त्यामुळे त्याच्यात यश मिळाले नाही तर नैराश्य येणार नाही. तरुणांची पराभूत मनोवृत्ती नाहीशी झाली पाहिजे असेही ती म्हणाली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राजस्व अधिकारी या पदाची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. परंतु, एवढ्या वरच आपण थांबणार नसून भारतीय प्रशासनिक सेवेतील उच्च परीक्षा उत्तीर्ण करण्याचे स्वप्न असल्याचेही तिने सांगितले. महात्मा फ़ुले, डॉ आंबेडकर हें आपले आदर्श असून बाबा आमटे व प्रकाश आमटे हे आवडते व्यक्तिमत्त्व असल्याचे तीने सांगितले.

# सामुदायिक प्रार्थनेने मिळते शांती समाधानाची शिकवण

## आ.श्याम खोडे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी/१६ फेब्रुवारी**

**मंगरूळनाथ :** ज्या ज्या गाव खेड्यामध्ये गुरुदेव सेवा मंडळाची प्रार्थना होते, त्यातून गावामध्ये सुख-शांती-समाधानाची शिकवण मिळते. म्हणून श्री गुरुदेवाची प्रार्थना, भजन, कीर्तन नियमित व्हावी याकरिता सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. असे उद्गार सत्काराला उत्तर देताना आमदार श्याम खोडे यांनी काढले.

येथील कुळकर्णी लेआउट मधील श्री गुरुदेव प्रार्थना मंदिर परिसरात १६ फेब्रुवारी रोजी आमदार श्याम खोडे यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख उपस्थितीत लक्ष्मण आवटे, ज्योती उगले, मनोहर बनसोड होते. आ. खोडे यांच्या हस्ते श्री गुरुदेव प्रार्थना मंदिराच्या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन करण्यात आले. गाव - गाड्यांमध्ये एकोपा राहण्यासाठी राष्ट्रसंतांनी दिलेली शिकवण बहुउपयोगी आहे. म्हणून गावोगावी आणि प्रत्येक ठिकाणी राष्ट्रसंताची दररोज प्रार्थना, भजन, कीर्तन झाले पाहिजे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी शहापूर जि.प.शाळेच्या वतीने शिक्षीका मिरा वार्डेकर व मनोहर सावके यांनी सत्कार केला. सीताराम महाराज, तन्मय तुरक, सुधाकर भांडेकर, रवी खंडारे, सुचित देशमुख, संगीता भोजने, पूजा लोहिया आदींनी परिश्रम घेतले.

# चेंगराचेंगरीनंतर आता मध्य रेल्वे सतर्क

## गर्दीच्या व्यवस्थापनाकडे लक्ष

### सर्वसमावेशक व्यवस्थेची अंमलबजावणी



**प्रतिनिधी / १६ फेब्रुवारी**

**अमरावती :** नवी दिल्ली येथील चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी घटनेनंतर आता मध्य रेल्वे विभाग सतर्क झाला आहे. महाकुंभमेळासाठी प्रयागराज येथे जाणाऱ्या भाविकांना विनाव्यत्यय प्रवास अनुभव मिळावा, यासाठी मध्य रेल्वेने विशेष रेल्वे सेवा, अतिरिक्त प्रवाशी सुविधा आणि गर्दी व्यवस्थापन धोरणांसह सर्वसमावेशक व्यवस्था अंमलात आणल्या आहेत.

प्रवाशांच्या वाढत्या संख्येला सामोरे जाण्यासाठी मध्य रेल्वेने महाकुंभमेळासाठी ४२ विशेष रेल्वे गाड्यांचे नियोजन केले. या व्यतिरिक्त इतर रेल्वे विभागाद्वारे चालवल्या जाणाऱ्या अधिकच्या विशेष गाड्या मध्य रेल्वेच्या स्थानकांवरून जातील. त्यामुळे प्रवाशांना आणखी सुविधा उपलब्ध होईल. गर्दीचे नियोजन करण्यासाठी रेल्वेस्थानकांवर मदत केंद्र, अतिरिक्त तिकीट खिडक्या, उद्वाहकांमध्ये नियंत्रित प्रवेश, दुभाजकांच्या मदतीने पादचारी पुलावर एक दिशा मार्गांची अंमलबजावणी, सीसीटीव्ही देखरेख प्रतिक्षित प्रवाशांसाठी प्रमुख स्थानकांवर जमाव क्षेत्रे, गर्दी टाळण्यासाठी सरकते जिने आणि आणि घोषणांद्वारे नियोजित वेळेचे व्यवस्थापन, फलाटावर एकत्रितपणे गर्दी असलेल्या गाड्या येऊ नयेत, यासाठी रेल्वे गाड्यांचे धोरणात्मक नियोजन, सर्व प्रमुख स्थानकांवर अतिरिक्त रेल्वे सुरक्षा दल तसेच तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांसह रांग व्यवस्थापन प्रणाली आदी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

एखादी गाडी आपत्कालीन साखळीने किंवा इतर कारणांमुळे थांबली तर, प्रवाशांना माहिती देण्यासाठी, चुकीची माहिती रोखण्यासाठी आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे कर्मचारी ताबडतोब खाली उतरतील. जवळील स्थानके आणि आपत्कालीन नियंत्रण केंद्रांना इतर जाणाऱ्या गाड्यांचे नियमन करण्यासाठी सतर्क केले जाणार आहे. प्रवाशांना तत्काळ माहिती देण्यासाठी उद्घोषणांवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे, अशी माहिती मध्य रेल्वे विभागाकडून देण्यात आली.

### तिकिट विक्रीचे बारकाईने निरीक्षण

वाढत्या मागणीमुळे 'यूटीएस' तिकिट विक्रीचे बारकाईने निरीक्षण केले जात आहे. तिकीट तपासणी कर्मचारी सेवेसाठी असून या कर्मचाऱ्यांना आरक्षित प्रवाशांना मदत करणे, आरक्षित डब्यांमध्ये अनधिकृत प्रवेश रोखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रवासी व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्यासाठी वाणिज्यिक अधिकारी सत्रांमध्ये तैनात आहेत. गाड्या येण्यापूर्वी ३० मिनिटे आधीपासून उद्घोषणा प्रणालीवर सतत घोषणा केली जात आहे. वाणिज्यिक अधिकारी विशेषतः प्रवासी प्रस्थान होईपर्यंत उपस्थित आहेत. डब्यांची स्थिती मागील स्थानकावरून निश्चित केली जात असून आगाऊ प्रदर्शित करण्यात येत आहे. अनधिकृत खानपान होणार नाही याची खात्री करण्यासाठी खानपान व्यवस्थापनाचे नियोजन असून यामुळे फलाटावरील गर्दीत घट होत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.


**आवश्यकता आहे**

Sand & Stone Property Developers

- साईड सुपरवायझर - ३ (लेआऊट आणि बांधकाम साईड अनुभव असलेली व्यक्ती)
- फिल्ड सुपरवायझर - २
- महिला क्लर्क - २

(अनुभवींना प्राधान्य)

: Email :
rishiagrawal690@gmail.com



**पाहिजे**

घरगुती कामाकरीता बाई पाहिजे.

कामाची वेळ : १० ते ५

पगार : ७५००/-रू

- पत्ता -

पियुष गणवीर

हार्दिक कॉलणी, विद्युत नगर, व्ही.एम.व्ही.रोड, नवसारी जवळ, अमरावती

मो.नं.-7875015083



**पाहिजे**

ऑफिस कामा करीता चपराशी (मुलगा) पाहीजे

स्वत:ची सायकल असणे आवश्यक

Sand & stone Bilders & Developers

पहिला माला रावले काम्प्लेक्स खापर्डे बगीचा, अमरावती

8600359866, 9371131672


**जाहीर सुचना**

**वरुड तालुक्यातील ( क व ड ) वर्गातील सहकारी संस्थांच्या प्राथमिक मतदारयादी प्रसिध्दीबाबत सुचना ( फक्त सभासदासाठी )**

१) रोषनखेडा सेवा सहकारी संस्था मर्या. रोषनखेडा र.नं.५४१

२) महात्मा फुले कला वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय कर्मचारी सहकारी संस्था मर्या. वरुड र.नं.५५०

३) महादेव मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. जरुड र.नं.५२६

उपरोक्त सहकारी संस्थेचा तात्पुरत्या मतदार यादीचा कार्यक्रम महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे तरतुदीनुसार दिनांक १७/०२/२०२५ रोजी संबंधीत संस्थेचे कार्यालय तसेच तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था वरुड यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर संस्थेच्या तात्पुरत्या मतदार यादीवर हरकती/आक्षेप असल्यास तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वरुड यांचे कार्यालयात दि.१७/०२/२०२५ ते २४/०२/२०२५ (शासकीय सुटीचे दिवस वगळून) ह्या कालावधीत स्विकारण्यात येतील.

(वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत)

प्रसिध्दी दि.१७/०२/२०२५

(ए.डी.चर्जन)

तालुका सहकारी निवडणुक अधिकारी

तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वरुड

# कुऱ्हा येथे श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी



**वार्ताहर/१६ फेब्रुवारी**

**कुऱ्हा :** १५ फेब्रुवारी ला शनिवार रोजी श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती कुऱ्हा पोलीस स्टेशन समोरील हनुमान मंदिर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अमोल देऊळकर, नागेश लुटे, कैलास दमाये, आकाश ठाकूर गौरव डहाके, दीपक राऊत, रुपेश बिघने, अंकुश इंगोले, हर्षल दारोकार, सुरज राठोड,क मलेश चिरडे, अनिल कुऱ्हाडे आदींचा उपस्थिती होती. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते श्री संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन हारापर्ण करून क्रांतिसिंह सेवालाल महाराज (१५ फेब्रुवारी १७३९ - ४ जानेवारी १७७३ ) हे भारतीय समाजसुधारक होते. शूरवीर लढवय्या 'गोरराजवंशी बंजारा' समाजातील प्रख्यात सतगुरू होते. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुट्टी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला. आता ते गाव सेवागड या नावाने ओळखले जाते.असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.यावेळी गावातील तरूण युवा तसेच हिंदू मित्र परिवार कार्यक्रमाला उपस्थित होते.


दैनिक मातृभूमि हे पत्र प्रकाशक, मुद्रक अनिल जुगलकिशोर अग्रवाल यांनी प्रणय कम्युनिकेशन, मच्छीसाथ, सातखिराडी रोड, अमरावती येथे मुद्रित करून दैनिक मातृभूमि कार्यालय, खापर्डे बगीचा, अमरावती येथे प्रसिध्द केले.

मालक :पद्म प्रतिष्ठान संपादक : अनिल जुगलकिशोर अग्रवाल


आरएनआय क्र : MAHMAR/2010/35500 Postal No.ATIRN/291

जिल्हा कार्यालय (फोन-०७२१) २५५०८५०, २५५०१४३, २६६६६००

email:amtmatrubhumi@gmail.com वर्ष-१५, अंक १४८


# आ.डॉ.कुटे यांनी घेतला सदस्य नोंदणीचा आढावा

## विधानसभा क्षेत्रात १७ हजारावर नोंदणी



**प्रतिनिधी/१६ फेब्रुवारी**

**बुलढाणा :** महाराष्ट्र माजी मंत्री आमदार डॉ.संजय कुटे यांनी दि. १६ फेब्रुवारी रोजी भाजपा बुलढाणा जनसेवा कार्यालय येथे आयोजित बैठकीत बुलढाणा शहरातील भाजपा प्राथमिक सदस्य नोंदणीचा आढावा भाजपा पदाधिकारी यांच्या कडून घेतला यावेळी भाजपा बुलढाणा विधानसभा प्रमुख योगेंद्र गोडे यांच्या नेतृत्वात बुलढाणा विधानसभेत १७ हजार २०० नोंदणी झाली असल्याचा आढावा उपस्थित पदाधिकारी कार्यकर्ते यांनी दिला.

तसेच सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना आगामी होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मार्गदर्शन आ. डॉ. संजय कुटे यांनी केले. याच वेळी नुकतेच भाजपा मध्ये प्रवेश घेतलेले माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश सिनकर, माजी शिवसेना शहर प्रमुख मुन्ना बेंडवाल, माजी शिवसेना शहर प्रमुख नारायणजी हेलगे, मल्हार संघटने चे नंदू लवंगे यांचा भाजपा बुलढाणा विधानसभा प्रमुख योगेंद्र गोडे यांच्या मार्गदर्शनात भाजपा बुलढाणा पदाधिकारी कार्यकर्ते तर्फे सत्कार करण्यात आला.

यांप्रसंगी मंचावर भाजपा नेते बुलढाणा सिद्धार्थ शर्मा, भाजपा जिल्हा उपाध्यक्षा विजया राठी, भाजपा जिल्हा सचिव बाळासाहेब गीन्हे, नगरसेवक गोविंदाव सराफ उपस्थित होते. या बैठकीला माजी जिल्हा सचिव बाबासाहेब वरनगावकर, माजी शहर सरचिटणीस आशिषजी व्यवहारे, भाजपा युवा मोर्चा जिल्हा महामंत्री सोहम झाल्टे, भाजपा अल्पसंख्याक आघाडी शहराध्यक्ष आसिफभाई, माजी सैनिक अशोक किलबिले, भाजपा शहर उपाध्यक्ष हर्षल जोशी, सचिन टॅभिकर, वैभव इंगळे, नितीन दासर, दत्ता जेऊथाले, प्रदीप बेगानी, भाजपा जैन प्रकोष्ट सोशल मिडिया प्रदेशाध्यक्ष तेजस भंडारी, प्रदीप सोनटक्के, नितीन श्रीवास, मोहित भंडारी, प्रितेश बेदमुथा, सचिन जोशी, आदित्य उदयकार, महेश तलवारे, अथर्व, टाकळकर, अक्षय छाजेड, अमानुल्ला खान, सर्जेराव देशमुख, विजय भुसारी, किरण तायडे, पंजाबराव गाढे यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नगर परिषद कार्यालय, वरुड, जि.अमरावती**

**- जाहीर सुचना-**

**''अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत''**

सर्व नागरिकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यांतर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६५ सेवाची यादी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करुन नगर प्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास वरुड नगर परिषद कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपरिषद तर्फे जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी वरुड नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड व महाराष्ट्र शासन राजपत्र प्राधिकृत प्रकाशन वर्ष ११ अंक ५ गुरुवार ते बुधवार, जानेवारी ३० फेब्रुवारी ५, २०२५/माघ १०-१६, शके १९४६ भाग एक-अ-अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मुख्याधिकारी

नगरपरिषद, वरुड